International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# संत नामदेव आणि संत तुकाराम यांचे सामाजिक योगदान

**डॉ. महेश प्र. गोमासे[1], डॉ. शांतरक्षित वि. गावंडे[2]**
[1]इतिहास विभाग, नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत, जि. यवतमाळ
[2]मराठी विभाग, नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत, जि. यवतमाळ
*Corresponding Author – डॉ. महेश प्र. गोमासे*
**DOI - 10.5281/zenodo.15251025**

**संशोधन निबंध गोषवारा :**

भारताला संतांची मोठी परंपरा लाभली आहे.संत कबीर संत मीराबाई ते संत तुकाराम अशी संतांची दीर्घ परंपरा लाभली आहे.अठरापगड जातीतील संतांनी तत्कालीन व्यवस्थेतील व्रत वैकेल्ये आदी दांभिकतेवर प्रहार केले आणि समस्त बहुजन समाजाला जागृत केले .

संतांनी ढोंगी प्रथा परंपरेला विरोध करून निष्काम कर्मयोग सांगितला पर्यायाने नव समाज निर्मितीसाठी कार्य केले.

संत नामदेव आणि संत तुकारामांनी आपल्या आचार विचारातून वैश्विक मूल्ये सांगितली.संत नामदेवाची भक्ती कर्मकांड नाकारणारी होती. त्यामुळे खऱ्या रोकड्या तत्वाची त्यांनी जाणीव करून करून दिली.संत तुकारामांनी समाजात निर्माण होत असलेल्या प्रश्नांची उकल करून मानवी जीवनाला उपकारक मार्गदर्शन केले.

भारताला संतांची मोठी परंपरा लाभली आहे.संत कबीर संत मीराबाई ते संत तुकाराम अशी संतांची दीर्घ परंपरा आहे.खऱ्या अर्थाने भारतीय संतांची त्या त्या प्रदेशानुसार लोकभाषेतील प्रबोधन चळवळ आहे.या काळातील संत स्थानिक भाषांमध्ये उपदेश करत असत.

कर्नाटकात लिंगायत पंथ म्हणून जातिव्यवस्थेला आव्हान देणारे अनेक पंथ समाजात उदयास आले. तमिळनाडूमध्येही असाच एक पंथ उदयास आला आणि त्याला सिद्धार असे म्हटले गेले.महाराष्ट्रात संत नामदेव एकेश्वरवादी होते ज्यांनी जातीभेद आणि मूर्तीपूजेला विरोध केला. म्हणूनच, त्यांना संत कबीरांचे अग्रदूत मानले जाते.

महाराष्ट्र प्रबोधन भूमी आहे कारण ही संतांची भूमी आहे. येथील संतांनी आपल्या कृती कार्यामधून,अभंग ओवी आणि कीर्तनातील तत्वज्ञानातून अंधाएग्रस्त समाजाला प्रबोधित केले.संतांनी अनिष्ठ प्रथेवर ' वार ' करून 'वारकरी' संप्रदायाद्वारे सर्वांना एका समतेच्या छायेखाली आणले. आपल्या रचनेतून जातिभेदाच्या तटभिंती उध्वस्त केल्या.प्रस्तुत शोधनिबंधात संतांच्या सामाजिक चळवळीची पुढील गृहितके सिद्ध करायची आहेत.

१. अठरापगड जातीतील संतांनी तत्कालीन व्यवस्थेतील व्रत वैकेल्ये आदी दांभिकतेवर प्रहार केले आणि समस्त बहुजन समाजाला जागृत केले.
२. संतांनी ढोंगी प्रथा परंपरेला विरोध करून निष्काम कर्मयोग सांगितला पर्यायाने नव समाज निर्मितीसाठी कार्य केले.
३. संत नामदेव आणि संत तुकारामांनी आपल्या आचार विचारातून वैश्विक मूल्ये सांगितली.

४. दोन्ही संतांचा परमार्थ म्हणजे सर्वसामान्यांच्या जीवनतील आनंदशोध होय.

५. दोन्ही संतांनी सर्वसामान्य माणसांना सत्यान्वेषी जगण्याचे सूत्र दिले.

महाराष्ट्रातील संत चळवळीचा प्रारंभ यादवांच्या शेवटच्या ऱ्हाससकाळात सुरू झालेली दिसते. महाराष्ट्रावर ज्यावेळी परकीयांचे आक्रमण होत होते आणि नैसर्गिक आपत्तीही आली त्यावेळी संत चळवळ आकारास आली. सगळीकडे आर्थिक दुरावस्था, सगळ्या क्षेत्रात जुलूम, बेबंदशाही सुरु होती तेव्हा या संकटातून या समाजाला प्रकाश देण्याचे कार्य संतांनी केले.संतचळवळीत वारकरी संप्रदाय सर्वाधिक लोकप्रिय आणि दीर्घकाळ टिकलेला संप्रदाय आहे.माणसांतच देव शोधा ही शिकवण वारकरी संप्रदायाने दिली.

यामध्ये संत ज्ञानेश्वर संत निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई ही भावंडे, संत नामदेव,त्यांचे गुरु विसोबा खेचर,संत तुकाराम, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, चोखामेळा, सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार,संत जनाबाई,कान्होपात्रा, सोयराबाई या व अशा समाजातील सर्वच वर्गातील संतांनी समाजशिक्षक म्हणून भूमिका निभावलेली आहे.या सर्व संतांनी याबाबत लोकांना जागृत केले किंवा स्वानुभावरून वस्तुपाठ घालून दिला.

हे जग आनंदात रहावे यासाठी ' शतकोटी करीन तुझेच अभंग ' अशी संत नामदेवांनी प्रतिज्ञा केली.' दुरितांचे तिमिर जावो ' या दिशेने संत ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्ग सांगितला.' भेदाभेद भ्रम अमंगळ ' असे स्पष्ट करून संत तुकारामांनी सामान्य माणसांना समतेचा प्रज्ञापथ दाखविला.हे तीन संत म्हणजे महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचे प्रातिनिधिक त्रीरत्ने आहेत.

महाराष्ट्रातील सर्व संत अठरापगड जातीतील विविध व्यवसायातील आहेत असा शब्द या निबंधात आहे. त्याचा अर्थ जातवाचक नसून ' सम्यक समूहातील ' या अर्थाने आहे.हा मुद्दा समजून घेऊ या.

संत जनाबाई अनाथ होती, परंतु जनाबाईला संत सहवासात आणि विठ्ठल भक्तीत जीवनाचा अर्थ सापडतो.अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतून चोखामेळा, सोयराबाई, बंका असे संत आहेत, शुद्र जातीतून गोरा कुंभार, नामदेव, तुकाराम, सावता माळी तसेच मुक्ताबाई, जनाबाई, गोराई अशा स्त्रिया यात आहेत. विशेष म्हणजे वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या या संतमंडळीना एकमेकांप्रती प्रचंड आदर होता.संत तुकाराम ज्ञानेश्वरांचा 'ज्ञानियांचा राजा' असा उल्लेख करतात. तर संत तुकाराम हे संत नामदेवांना गुरुस्थानी मानतात -

**" नामदेवे केले स्वप्नामाजी जागे**
**सवे पांडुरंगे येऊनिया**
**सांगितले काम करावे कवित्व**
**वाऊगे निमित्त बोलू नये "**

त्याचबरोबर संत नामदेवाच्या अभंगातही ज्ञानेश्वरांविषयी आदर दिसून येतो. पुढे संत एकनाथ या सर्व संतमंडळीना पूजनीय मानून आपले प्रबोधनकार्य चालू ठेवतात.संत जनाबाईस्वतःचा उल्लेख 'नामयाची दासी' असा करून चोखामेळाला अस्पृश्य म्हणून सहन करावा लागणारा त्रास मांडते. या सर्व संतांनी अभंग, ओव्या, भारुडे, कीर्तने, गौळणी, विराण्या या अभिव्यक्ती प्रकारातून आपली भूमिका अधोरेखित केली.

संत ज्ञानी होते. संत तुकारामांच्या ' वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ' या वचनावरून हे लक्षात येते. निरीक्षण आणि जगण्याची सचोटी या अनुषंगाने संतांना समाजाबद्दल भरपूर व्यावहारिक ज्ञान होते.

**'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लाऊ जगी '** हा उद्घोष करणारे संत नामदेव यांनी प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्राची भावनिक एकात्मता जपली. त्यांना वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक संबोधले जाते. संत नामदेवांचे २५०० अभंग आहेत. विशेष म्हणजे काही अभंग नामदेवकी मुखबानी म्हणून शीख पंथाच्या गुरु ग्रंथ साहेब मध्ये गुरुमुखी लिपीत आहे.संत ज्ञानेश्वरानंतर ५० वर्ष त्यांनी वारकरी संप्रदायाचे कार्य सुरु ठेवले.संत

ज्ञानेश्वरांचे चरित्र आदी, समाधी, तीर्थावळी यातून मांडले.

संत नामदेवाची भक्ती कर्मकांड नाकारणारी होती. त्यामुळे खऱ्या रोकड्या तत्वाची त्यांनी जाणीव करून करून दिली. सोवळ्या ओवळ्यात पडू नका हे त्यांनी सांगितले.

**"सोवळे ओवळे उच्च नीच वर्ण |**
**नाही येथे गुणदोष काही || "**

सोवळ्या ओवळ्याला विटाळाला अर्थात उच्चनिचतेला भक्तीक्षेत्रात थारा नाही हे संत नामदेवांनी स्पष्ट केले. म्हणून संत नामदेव समतेचे पाईक ठरतात.

समतेची बीज रोवून विषमतेवर प्रहार केला. विसोबा खेचरांना गुरु मानणार्या संत नामदेवांनी जेंव्हा संत चोखोबांच्या परिवारावर आपत्ती आली तेव्हा ते मंगळवेढ्याला गेले आणि चोखोबांच्या अस्थी स्वतः आणून खुद्द पंढरपुरच्या विठ्ठलाच्या पायरीशी संत नामदेवांनी चोखोबांच्या मंदिराची निर्मिती केली.

संत तुकारामांनी समाजात निर्माण होत असलेल्या प्रश्नांची उकल करून मानवी जीवनाला उपकारक मार्गदर्शन केले. संत तुकारामांनी सर्वसामान्य लोकांना समजेल अशा रचना केल्या.जेव्हा जेव्हा जीवन आपत्तीने घेरले जाते तेव्हा ढोंगी साधूंच्या आहारी न जाता सत्याच्या मार्गाने जा, असे ते बजावतात. संत तुकारामांनी जप तप अनुष्ठानाची जळमटे जाळून टाकली.

**"ऐसे कैसे झाले भोंदू**
**कर्म करोनी म्हणती साधू "**

ही संत तुकारामांची रोकठोक भूमिका होती.ही सडेतोड भूमिका मांडतांना त्यांनी कुणाची भीडमुर्वत ठेवली नाही कारण त्यांचा सत्यावर विश्वास होता.

**"सत्य असत्याशी मन केले ग्वाही**
**मानियेले नाही बहुमता "**

अशी सत्यनिष्ठ भूमिका त्यांची होती.प्रचलित दंतकथांवर त्यांचा विश्वास नव्हता.त्यामुळे त्यांनी अनुभवाला महत्व दिले. या अनुषंगाने ते म्हणतात -

**"नका दंतकथा येथे सांगू कोणी**
**कोरडे ते माने बोला कोणी |**
**अनुभव येथे व्हावा शिष्टाचार**
**न चलती चार आम्हा पुढे || "**

संत तुकारामांनी अनुभवाच्या ज्ञानाची अनुभूती येथे व्यक्त केली आहे.

संत तुकारामांनी समग्र संतांच्या कृतज्ञतेची जाणीव आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे या दृष्टीने संत तुकाराम हे उदार अंतःकरणाने संतान बद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

**"काय या संताचे मानू उपकार**
**मज निरंतर जागविती || "**

संत तुकारामांना अनुभवाच्या अभ्यासा अंती जाणवलेले सत्य त्यांनी नोंदवलेले असले तरी ही त्यांच्या ठिकाणी असलेल्या नम्र भावनेची येथे प्रचिती येते.

काम क्रोधावर विजय मिळवणे म्हणजे संतत्व प्राप्ती करणे होय असे त्यांचे म्हणणे होते. जब तक अनुष्ठान नाकारताना त्यांनी मोहापासून मुक्तीचा उपदेश लोकांना दिला यासंदर्भाने ते म्हणतात

**"काम क्रोध अहंकार नको देही आशा तृष्णा माया**
**लज्जा चिंता काही"**

काम क्रोध अहंकार कृष्णा यापासून माणसाने मुक्ती मिळवावी असे ते सुचित करतात संत तुकारामांचा हाच भक्तियोग आहे त्या भक्तीयोगाला सामाजिक अधिष्ठान आहे.

**निष्कर्ष :**

१) भारताला संतांची मोठी परंपरा लाभली आहे.
२) महाराष्ट्रातील अठरापगड जातीतील संतांनी तत्कालीन व्यवस्थेतील व्रत वैकेल्ये आदी दांभिकतेवर प्रहार केले आणि समस्त बहुजन समाजाला जागृत केले .
३) संत नामदेवाची भक्ती कर्मकांड नाकारणारी होती. त्यामुळे खऱ्या रोकड्या तत्वाची त्यांनी जाणीव करून करून दिली.

४) संत तुकारामांनी समाजात निर्माण होत असलेल्या प्रश्नांची उकल करून मानवी जीवनाला उपकारक मार्गदर्शन केले.ढोंगी साधूंच्या आहारी न जाता सत्याच्या मार्गाने जा, असा उपदेश केला.
५) काम क्रोधावर विजय मिळवणे म्हणजे संतत्व प्राप्ती होय ही संतांची भूमिका होती.

**संदर्भ ग्रंथ :**


१) मराठी संतांचे सामाजिक कार्य - विष्णू भिकाजी कोलते अनुवाद - डॉ.सुमती कोलते लोकवाङ्मयगृह
२) डॉ.मोहरीर ल.का.संत तुकारामांची जीवननिष्ठा प्र. आ.
३) चित्रे दिलीप पुरुषोत्तम, तुकोबांचे वैकुंठगमन, (पहिली आवृत्ती-शब्दालय प्रकाशन)
४) श्री तुकारामबावांची अभंगगाथा शासकीयप्रत-द्वि.आ.
५) माटे श्री.म.संत पंत व तंत (द्वि.आ. स्नेहवर्धन प्र.)
६) डॉ. भिंगारकर कृ.ज्ञा., संत तुकाराम आणि संत कबीर (प्र.आ.स्नेहवर्धन प्रकाशन पुणे )
७) जाधव मनोहर, प्रबोधन आणि परिवर्तन
८) सरदार गं. बा., संत वाङ्याची सामाजिक फलश्रुती (चौथी आवृत्ती, लोकवाङ्मयगृह)